# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.नि.वि.वि./४९४/२४/२०१५

**परिपत्रकः—**

सर्व प्राचार्य, संलग्नित अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था, संचालक/विविध विभाग प्रमुख, विद्यापीठांचे विविध विभाग यांना कळविण्यात येते की, आपल्या देशातील सागरी किना—यालगत असलेल्या राज्यांना सागरीविज्ञान व तंत्रज्ञान तसेच महाराष्ट्रातील शैक्षणिक व संशोधनातील प्रगतीचा वेग वाढविण्याच्या पार्श्वभूमीवर मुंबई विद्यापीठांतर्फे सिंधु स्वाध्याय संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या दि. ८ जानेवारी २०१३ रोजी (बाब क्र. १०) झालेल्या बैठकीत मंजुर करण्यात आला. त्या अनुषंगाने सिंधु स्वाध्याय संस्थेची स्थापना ५ सप्टेंबर २०१४ रोजी जीवशास्त्र विभाग, विद्यानगरी संकुल, सांताक्रुज, मुंबई — ४०० ०९८ येथे करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने पदव्युत्तर एम.एससी प्राणीशास्त्र अभ्यासक्रम, (सागरी विज्ञान व मस्त्योपादन) M.Sc. in Zoology (Oceanography, Marine Science And Aqua Culture) हा प्राध्यान्याने शैक्षणिक वर्ष २०१४—२०१५ पासून जीवशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई — ४०० ९८ येथे सुरू करण्यात आलेला आहे.

तसेच श्री. विनायक दळवी, अध्यक्ष, प्राणीशास्त्र अभ्यासमंडळ यांची शैक्षणिक समन्वयक म्हणून नेमणूक केली आहे. आणि डॉ. बी. एल. जाधव, जीवशास्त्र विभागप्रमुख, मुंबई विद्यापीठ यांची प्रशासकीय समन्वयक म्हणून नेमणूक केलेली आहे.

उपरोक्त विषयाचे संशोधन केंद्र सिंधुदुर्ग जिल्हयात स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे.

उपरोक्त सिंधू स्वाध्याय संस्था, जीवशास्त्र इमारत येथून सेंटर फॉर बेसिक सायन्स (Centre for Basic Science) आरोग्य केंद्र, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुज, मुंबई ४०० ०९८ येथे स्थलांतर करण्यात आलेले आहे.

दि. १८ मार्च २०१५
ठिकाण — मुंबई — ४०० ०३२

डॉ. एम.ए.खान
कुलसचिव
मुंबई विद्यापीठ